मार्ट

N.C.R.B (एन.सी. ...)
I.I.F.-I (एकीकृत ...)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** डहाणु **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 20:57 बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम)** **Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारणा २०१८) | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

(... सी. आर.बी) (... फॉर्म - १)

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 27/07/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/07/2021
   **Time From (वेळेपासून):** 14:14 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/07/2021 **Time (वेळ):** 20:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 030 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/07/2021 20:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 3 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दिवाणी न्यायालय यांचे कार्यालय, पहिला मजला, डहाणू न्यायालय,डहाणु

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** इम्रान इस्माईल शेख
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 8550977860,चारोटी नाका,डहाणु,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 8550977860,चारोटी नाका,डहाणु,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8550977860

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.राजेंद्र पुंडलिक परदेशी कनिष्ठ लिपीक वर्ग3 सह दिवाणी न्यायालय डहाणू | | | 1. रूम नं302, बी विंग,,जयराज अपार्टमेंट, डहाणू गाव,,डहाणु,डहाणु , पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2000/ रुपये रोख रक्कम ,त्यामध्ये 500/रुपये दराच्या 04नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्कुवेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 27/07/2021 मी इम्रान इस्माईल शेख, वय-30 वर्षे, धंदा- कोल्ड्रींग सप्लायर, रा.चारोटी नाका, ता.डहाणू, जि. पालघर मोबाईल क्र.8550977860 असा असून समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वरील प्रमाणे असून कासा ते डहाणू परीसरात कोल्ड्रींग सप्लायरचा व्यवसाय करतो. माझे विरूध्द कासा पोलीस ठाणे, जि.पालघर येथे मारामारीचे अनुषंगाने दोन गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.डहाणू न्यायालय येथे दाखल करण्यात आलेले आहे. सदर दोषारोपपत्रास मा.न्यायालयाकडून आर.सी.सी.क्र. 30/2014 व आर.सी.सी.क्र.51/2017 असा प्राप्त झालेला आहे. मा.डहाणू न्यायाकडील खटला क्र. आर.सी.सी.क्र.30/2014 चा निकाल दिनांक 25/10/2018 रोजी लागलेला आहे तसेच आर.सी.सी.क्र.51/2017 चा निकाल दि.10/10/2018 रोजी लागलेला असून मा. न्यायालयाने नमूद दोन्ही गुन्ह्यामधून माझी निर्दोष मुक्तता केलेली आहे. डहाणू न्यायालयाकडील नमूद दोन्ही निकालाच्या साक्षांकित प्रती मिळण्याबाबत मी मे.ज्यू.मजिस्टेट, प्रथम वर्ग डहाणू यांचेकडे दिनांक 23/07/2021 रोजी अर्ज केलेला असून सदर अर्जाची प्रत डहाणू न्यायालयाचे श्री.राजेंद्र परदेशी, कनिष्ठ लिपीक यांचेकडे सादर केलेली होती. त्यावेळीस सदर निकालाची सत्यप्रत लवकर देणेकरीता श्री.परदेशी साहेब यांनी माझेकडून 1,000/-रूपये घेतले. त्यानंतर मी पुन्हा दिनांक 26/07/2021 रोजी सदर निकालाची प्रत घेण्याकरीता डहाणू न्यायालयातील श्री.परदेशी साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला जुने गठ्ठे काढावे लागतील असे सांगून त्यांनी माझेकडून पुन्हा 500/-रूपये घेतले परतु मला निकालाची प्रत दिलेली नाही. तसेच सदर निकालाची प्रत उदया दि.27/07/2021 रोजी देतो असे सांगून सदरची प्रत देणेकरीता त्यानी अजून माझेकडे 3000/-रूपयाची लाचेची मागणी केलेली आहे. परंतू मला डहाणू न्यायालयातील श्री.परदेशी साहेब यांना लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने मी दिनांक 27/07/2021 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयात जावून डहाणू न्यायालयाचे श्री.राजेंद्र परदेशी, कनिष्ठ लिपीक यांचेविरूध्द लेखी तक्रार दिली आहे. माझे सदर तक्रारीचे अनुषंगाने पुढील कारवाई करणेकामी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयाचे पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद कार्यालय, पालघर येथे पत्र देवून दोन पंच साक्षीदार मागवून घेतले. सदर पंचाना माझी तक्रार वाचण्यास दिली व माझे कामाचे अनुषंगाने लोकसेवक श्री. परदेशी हे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंच व पडताळणी पथक डहाणू येथे येवून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच नं. 01 श्री.भुयाळ यांचेसह डहाणू न्यायालय येथे जावून लोकसेवक श्री.परदेशी यांना भेटून कामाच्या अनुषंगाने बोलणी करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच नं.01 यांचेसह डहाणू न्यायालय येथे जावून श्री.परदेशी यांची भेट घेवून माझे कामाचे अनुषंगाने त्यांना काम रेडी आहे का असे



Scanned with CamScanner

विचारले. त्यावेळी लोकसेवक श्री.परदेशी यांनी मला काम रेडी आहे असे सांगितले व लोकसेवक श्री.परदेशी यांनी उजव्या हाताचे बोटाचा ईशारा करून मला पैशाबाबत विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना किती दयायचे तुम्ही तीन हजार सांगितले आहेत. त्यापैकी पंधराशे रूपये दिलेले आहेत असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री.परदेशी यांनी पंचविशे देवून टाक नंतर पुढच्या वेळेस तस काम असेल तर पटकन होईल. आता काय तरी कर...आणजा पटकन मी तुम्हाला लगेच सोडतो. दया तुमच्या हिशोबाने...पावतीचे वेगळे दया. असे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री.परदेशी यांना मी दोन हजार रूपये घेवून थोड्या वेळात येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं.01 श्री.भुयाळ असे पडताळणी पथकाजवळ आलो त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांनी सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले असता सदर संभाषणामध्ये लोकसेवक श्री.परदेशी यांनी पडताळणी दरम्यान माझेकडे 2500/-रूपयाची मागणी करून तडजोडी अंती 2000/-रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सदरची लाचेची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाई तात्काळ करणे आवश्यक असल्याने लागचीच सापळापूर्व पंचनाम्याची कायदेशिर पूर्तता करून पोलीस उप अधीक्षक श्री.जगताप यांचे सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हॉईस रेकॉर्डर लावून तसेच अँथ्रासिन पावडर लावलेल्या लाचेच्या 2000/- रूपये रक्कमेसह पंच नं. 01 श्री.भुयाळ याचेसोबत डहाणू न्यायालय येथील लोकसेवक श्री.परदेशी यांचे कार्यालयात गेलो. त्याचवेळी माझे पाठोपाठ अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाचे सापळा पथक लोकसेवक श्री.परदेशी यांचे कार्यालयाचे बाहेर डहाणू न्यायालयाचे परीसरात कोणास संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबले. त्यानंतर मी श्री.परदेशी यांचे डहाणू न्यायालय येथील कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली असता लोकसेवक श्री.परदेशी हे त्यांचे काम करीत होते. व त्यांनी माझेकडे पाहून त्यांनी त्यांचे उजव्या हाताचे बोटाने पैशाबाबत ईशारा केला. त्यावेळी मी 2000/-रूपये लाचेची रक्कम लोकसेवक श्री.परदेशी यांना दिली असता लोकसेवक श्री.परदेशी यांनी सदर लाचेची रक्कम माझेकडून त्यांचे उजव्या हाताने स्विकारून ती त्यांचे शर्टाचे पुढील बाजूचे डाव्या खिशामध्ये ठेवली. त्यांनतर सदर लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी लोकसेवक श्री.परदेशी यांचे कार्यालयाचे बाहेर येवून सापळा पथकास पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकाने श्री.परदेशी यांना सह दिवाणी न्यायालय यांचे कार्यालय, पहिला मजला, डहाणू न्यायालय येथे लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. तसा सविस्तर पडताळणी, सापळा पूर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी लोकसेवक श्री.राजेंद्र पुंडलिक परदेशी, वय-44 वर्षे, कनिष्ठ लिपीक (वर्ग3) सह दिवाणी न्यायालय डहाणू, ता.डहाणू, जि.पालघर राहणार-रूम नं.302, बी विंग, जयराज अपार्टमेंट, डहाणू गाव, ता.डहाणू, जि.पालघर यांनी माझेविरूध्द दाखल असलेल्या डहाणू न्यायाकडील खटला आर.सी.सी.क्र.30/2014 व आर.सी.सी.क्र.51/2017 चे निकालाची सत्यप्रत देणेकरीता 3,000/-रूपयाची लाचेची मागणी केली. तसेच दिनांक 27/07/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, पालघर कार्यालयाकडून करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान 2500/-रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडी अंती 2000/-रूपयाची लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य करून सदर लाचेची 2000/-रूपये रक्कम आज दिनांक 27/07/2021 रोजी 14:14 वाजताचे सुमारास सह दिवाणी न्यायालय यांचे कार्यालय, पहिला मजला, डहाणू न्यायालय येथे स्विकारली असताना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कम्प पालघर) या कार्यालयाचे सापळा पथकाने रंगेहात पकडले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे. सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत केली असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** AMOL GOKUL GAVALI(SI (Sub-Inspector)) / DGPAGGM8601 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**



Scanned with CamScanner

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** AMOL GOKUL GAVALI
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(सं.):** DGPAGGM8601

ठाणे अंमलदार
[illegible] पोलीस ठाणे



Scanned with CamScanner